■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २७३ ■ शनिवार दि.२१ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 273 ■ Saturday Dt.21 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# तू आम्हाला पैसे परत मागतो का, तुला नीट परत जायचं आहे का? असे म्हणत वारकरी संप्रदायाच्या संस्थानामध्ये एकाला अमानुष मारहाण

## बीड जिल्ह्यात गुंड प्रवृत्ती वाढली; सत्यवानाच्या लाटेची धार्मिक क्षेत्रात दहशत पसरली?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

अरे.. बैलाला मारताना पण माणूस विचार करून मारतो, दिलेले पैसे परत मागितले ही काही चूक झाली का, जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था आहे का नाही?

# महाराज लोकांनो, स्वत:ला ज्ञानोबा तुकोबांचे अनुयायी समजता आणि या पद्धतीने वागता हे किती योग्य वाटतं?

## वारकरी संप्रदायाला काळिमा फासणारी घटना; नागरिकांत संतापाची लाट उसळली?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मारामारी अन् गुन्हेगारीच्या घटना काही थांबत नसल्याचे चित्र दिसत आहे. मुलाच्या शिक्षणासाठी भरलेली फी परत मागितल्याने वडिलांना १० ते १२ जणांकडून बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. तपभूमी येथील वारकरी संप्रदायाच्या संस्थान शाळेत हा धक्कादायक प्रकार घडला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील चिखली येथील मनोहर कचरू वारे यांचा मुलगा संप्रदायिक शिक्षण घेण्यासाठी बीडच्या तपभूमी वारकरी शिक्षण संस्थेत शिकण्यासाठी पाठवण्यात आला होता. यासाठी ५० हजार रुपये डोनेशन ची मागणी संस्थांचे सत्यवान महाराज लाटे यांनी केली. त्यापैकी ३० हजार रुपये मनोहर कचरू वारे यांनी दिले होते.





मात्र मुलांच्या काही अडचणीमुळे ऍडमिशन कॅन्सल झाल्यामुळे पैसे वापस मागितले. असता तू आम्हाला पैसे वापस मागतो का तुला जर आम्ही पैसे दिले तर आम्हाला सर्वांना पैसे द्यावे लागतील, तुला नीट वापस जायचं आहे का? नसता तू या डोंगराच्या बाहेर सुद्धा जाणार नाहीस असं म्हणत १० ते १२ जणांकडून संस्थानावरील खोलीमध्ये कोंडून अमानुष मारहाण करण्यात आली आहे. पायावरती हातावरती आणि पाठीवरती मारहाण केल्याचे व्रण दिसत आहेत आणि याचाच व्हिडिओ सध्याला व्हायरल देखील

▶ पान २ वर






## गेवराईतील छत्रपती मल्टीस्टेट बँक अखेर पोलिसांनी केली सील

### चेअरमनवर गुन्हा दाखल; आरोपीला शोधण्यासाठी पथक रवाना?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील छत्रपती मल्टिस्टेटला अखेर शुक्रवारी पोलीस प्रशासनाने सिल केले असून, ठेविदारास कोट्यावधीचा चुना लाऊन चेअरमन संतोष भंडारी परागंदा झाला आहे. संतोष भंडारी याने छत्रपती मल्टिस्टेट या नावाची सोसायटी काढून त्याने राज्यातील विविध शहरात या सोसायटीच्या शाखा कार्यरत आहेत. आर्थिक व्यवस्थेबाबत महाराष्ट्रभर गाजलेली छत्रपती मल्टीस्टेट शाखेकडून हजारो ठेविदारांचे पैसे बुडवणाऱ्या चेअरमन संतोष भंडारी यांच्या छत्रपती शाखेसमोर दोन दिवसापूर्वी पैसे न मिळाल्यामुळे एका ठेविदाराने आत्महत्या केली होती. या घटनेमुळे खळबळ उडालेली असता चेअरमन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यानंतर गेवराई येथील पोलीस प्रशासनाने या शाखेला कुलूप ठोकले आहे.

गेवराई शहरातील जुने बस स्टँड समोर असलेल्या छत्रपती मल्टीस्टेट या खाजगी पतसंस्थेत ठेविदार यांना जास्तीचे अमिष दाखवून ठेवी ठेवुनी घेतल्या होत्या. परंतु सर्वसामान्य लोकांनी पैसे परत मागितल्यावर ते पैसे देण्यास टाळाटाळ केली जात होती. त्यामुळे खचून गेलेले ठेविदार सुरेश आत्माराम जाधव (वय वर्ष ४०) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने संपूर्ण बीड जिल्ह्यात संताप जनक प्रतिक्रिया व्यक्त झाली असून, याप्रकरणी चेअरमन असणाऱ्या संतोष भंडारी यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. दि.२० वार शुक्रवार रोजी सकाळी पोलीस प्रशासनाच्या वतीने पंचनामा करूनच सील ठोकण्यात आले अशी माहिती प्रशासनाकडून मिळाली.

## विवाहितेची विषारी औषध प्राशन करत आत्महत्या

दौलावडगाव । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील उंदरखेल येथील वामन याच्या मुलीचा अंभोरा येथील धर्मा खाकाळ याच्या मुलाशी बारा वर्षापुर्वी विवाह झाला होता. काही दिवसापुर्वि दीर ज्ञानेश्वर याचा विवाह झाल्यानंतर प्रियंका हिस सासरा, सासू, दीर व जाव हे तुझ्या बापाकडून पैसे घेऊन ये, आणि तु आणि तुझा नवरा वेगळे घर बांधून रहा म्हणून सतत शिवीगाळ, शारीरिक व मानसिक त्रास देत असल्याचे तिने आई, वडिल याना फोनवर व माहेरी आल्यावर सांगत होती. ती हा त्रास सहन करत होती. कारण तीन मुलाचे भविष्य समोर ठेऊन ती होत असलेला त्रास सहन करत राहिली. पण त्रास आणखीच वाढत असल्याने सासरच्या राहत्या घरी सात दिवसापुर्वी तिने विषारी द्रव्य प्राशन केले.

▶ पान २ वर

## कुख्यात दरोडेखोरास दुचाकी चोरीच्या गुन्हयात पकडले

### पाच दुचाकी हस्तगत स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

दिनांक २०.०६.२०२५ रोजी महादेव भगवान दळवे, वय ५४ वर्ष, रा बालेपीर बीड यांनी पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, त्याचे राहते घरासमोरुन दुचाकी कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेली आहे वगैरे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरील दाखल गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी सदरील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या. त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरु केले असता दिनांक २०.०६.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त

▶ पान २ वर



# नवगण, विनायक शिक्षण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश क्षीरसागर

## ■ स्व.केशरकाकूंचा शैक्षणिक वारसा नव्या पिढीकडे ■ उच्चशिक्षित नेतृत्वाकडे शैक्षणिक संस्थेची धुरा

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या बीड येथील नवगण शिक्षण संस्था आणि विनायक युवक कल्याण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांची निवड गुरुवारी (दि.१९) करण्यात आली आहे. त्यांच्या रुपाने उच्चशिक्षित व्यक्तिमत्वाकडे शिक्षण संस्थांची धुरा सोपविण्यात आली असून त्यांचे निवडीबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.

बीडमध्ये नवगण शिक्षण संस्थेची स्थापना १९६३ साली लोकनेत्या व माजी खासदार स्व. केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांनी केली. त्याकाळी जिल्ह्यातील ग्रामीण व डोंगराळ भागात शिक्षणाच्या सुविधा अत्यंत अपुऱ्या होत्या. ही गरज ओळखून काकूंनी शेतकरी, ऊसतोड कामगार, गरीब व वंचित मुला -मुलींसाठी विविध शाळा व महाविद्यालयांची स्थापना करून शिक्षणाचा दिवा ग्रामीण भागात तेवत ठेवला. त्यांच्या प्रयत्नांमुळे संस्थेने लावलेले शैक्षणिक रोपटे आज वटवृक्ष बनले आहे. पहिल्यांदा संस्थेच्या सचिवपदी ३१ डिसेंबर १९६५ रोजी भागुजीराव सनगर, १९६८ मध्ये केशरकाकू क्षीरसागर, १९७७ मध्ये सोनाजीराव क्षीरसागर, १९८७ मध्ये भारतभूषण क्षीरसागर यांची नियुक्ती झाली. त्यानंतर आता सन २०२५ मध्ये सचिवपदी डॉ.योगेश क्षीरसागर यांची निवड झाली.



सध्या नवगण शिक्षण संस्थेअंतर्गत बीड जिल्ह्यातील विविध भागात ५ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, सैनिक विद्यालय, आश्रमशाळा, उर्दू शाळा प्रत्येकी १, ६ उच्च माध्यमिक शाळा, १० माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, व्यवसाय अभ्यासक्रम केंद्रे प्रत्येकी २ अशा विविध प्रकारच्या संस्था कार्यरत आहेत. यामध्ये एकूण सुमारे ६०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी सुमारे २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच, याशिवाय १९८४ साली स्थापन झालेल्या विनायक युवक कल्याण संस्थेमार्फत ३ माध्यमिक शाळा, २ प्राथमिक शाळा चालविल्या जातात. येथे सुमारे ५० कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी अंदाजे १००० विद्यार्थी शिक्षण घेतात. याआधी संस्थेचे सचिवपद डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी समर्थपणे सांभाळले. दरम्यान, आता डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या रूपाने मिळालेले नव्या दमाचे नेतृत्व, आधुनिक शिक्षणदृष्टी यामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत अधिक सकारात्मक परिवर्तन होईल, अशी अपेक्षा व्यक्ती केली जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

> “नवगण, विनायक शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शहर, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळावी, हा संस्थेचा मूलमंत्र राहिला आहे. या परंपरेत सातत्य राखून संस्थेचा विस्तार व शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी कटिबद्ध राहू. अधिकाधिक शैक्षणिक उत्कृष्टता, नाविन्यपूर्ण व्यावसायिक अभ्यासक्रम आणण्यासाठी प्रयत्न करू. तसेच, संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जातील.
>
> **-डॉ.योगेश क्षीरसागर,**
> नवनिर्वाचित सचिव,
> नवगण व आदर्श शिक्षण संस्था,
> बीड.

# शेतातील लटकत्या विद्युत तारा ठरत आहेत मृत्यूचे सापळे; शेतकऱ्यांच्या जिवाला धोका होण्याची शक्यता

घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर शिवारातील परिसरातील ५३९ गट नंबर शेतांमध्ये जमिनीपासून ५ ते ७ फुटांवरील सहजरित्या हाताने स्पर्श होईल अश्या लटकत्या आणि देखरेखीअभावी दुर्लक्षित झालेल्या विद्युत तारांमुळे गंभीर अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे. या धोकादायक तारांमुळे अनेकांना जीव गमवावा लागला असून, शेतकरी आणि शेतमजुरांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

अलीकडेच घाटनांदूर येथील एका नव युवक तरुणाचा शेतात काम करत असताना विद्युत तारेला स्पर्श झाल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून, संपूर्ण गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. शेतांमधून गेलेल्या विद्युत तारांना योग्य आधार नसल्यामुळे त्या खाली झुकलेल्या अनेक ठिकाणी पहिल्या मिळत आहेत. काही ठिकाणी



तारा तुटलेल्या अवस्थेत लटकत आहेत, तर काही ठिकाणी झाडांवरून जात आहेत. वीज वितरण कंपन्यांनी वेळोवेळी देखरेख न केल्यामुळे आणि स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या समस्या वाढत आहेत.

शेतकऱ्यांनी वीज वितरण कंपनी आणि प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही योग्य उपाययोजना न झाल्याचे सांगितले. सध्या पावसाअभावी शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आणि या शेतातील विद्युत पुरवठा असणाऱ्या तारा खाली काम करणे खूप कठीण होत आहे. आम्ही शेतात जीव धोक्यात घालून काम करतो, आणि कधी शेतीपंपाची विद्युत वेळ ही एक सप्ताह दिवसा असते तर एक सप्ताह रात्री मग अशा लटकत्या तारांमुळे आता काम करणंही जीवावर आलंय, असे येथील गट नंबर ५३९ मधील संतप्त शेतकऱ्याने संताप व्यक्त केला.

या प्रकारांवर तात्काळ उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. लटकत्या आणि तुटलेल्या विद्युत तारांची दुरुस्ती, मजबुतीकरण आणि योग्य देखरेख हवी. विद्युत वितरण कंपनीने सर्व शेतमालकांसोबत संवाद साधून या समस्या सोडवाव्यात. अशी शेतकऱ्यांन मधून प्रतिक्रिया येत आहेत. शेतकऱ्यांच्या जीवाची किंमत ओळखून घाटनांदूर येथील विद्युत सबस्टेशन अभियंता यांनी संबंधित यंत्रणांनी तत्काळ पावले उचलावीत, अन्यथा अशा घटनांचा बळी ठरणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढत जाईल. एक जबाबदार प्रशासन म्हणून ही गंभीर बाब गांभीर्याने घेणे काळाची गरज आहे.

# बीड शहर बचाव मंच कडून महेदवीया दायरा कब्रस्तानची पाहणी

बीड । प्रतिनिधी

शहरातील मोमीनपुरा भागात असलेल्या महेदवीया दायरा कब्रस्तानची पाहणी बीड शहर बचाव मंच ने शुक्रवार दिनांक २० जून रोजी केली. कब्रस्तानची झालेली दुर्दशा पाहून मंच चे पदाधिकारी आणि सदस्यांनी संवेदनशीतलता व्यक्त करत कब्रस्तानच्या संरक्षक भिंती बांधण्यासाठी तसेच कब्रस्तान मध्ये आवश्यक असलेल्या इतर सोयी सुविधा कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करून लवकरात लवकर पूर्णत्वास नेऊ असे म्हटले आहे.



यावेळी बीड शहर बचाव मंच च्या वतीने नितीन जायभाये, डी.जी. तांदळे सर व नितीन वाघमारे यांनी भूमिका स्पष्ट केली. गेल्या दहा वर्षांपासून बऱ्याच वेळेस लोकप्रतिनिधींना पाठपुरावा करूनही लोकप्रतिनिधीं दिलेले आश्वासन पाळत नाहीत, समाजाच्या अडचणी समजून घेण्याची कसलीही त्यांची मानसिकता दिसत नाही. कशाही – कसल्याही प्रकारे प्रतिसाद देत नाहीत, निवडणुकांनंतर तोंड ही दाखवत नाहीत. काम करणं दुरच राहीलं, साधा फोन ही उचलत नाहीत. अशी यावेळी उपस्थितांच्या वतीने प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. कब्रस्तानची पाहणी केल्यानंतर व ऐतिहासिकता जाणून घेतल्यानंतर नितीन जायभाये यांनी या कब्रस्तानच्या संरक्षक भिंतीचे पुनर्निर्माण करण्यात येईल,असे ठामपणे आश्वासन दिले आहे. बीड नगर पालिकेची नवीन असेंबली किंवा सभागृह अस्तित्वात येताच तात्काळ ही कामे करून दिल्या जातील. तसेच महेदवीया कब्रस्तानच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा निर्माण करून दिल्या जातील. असेही वचन दिले आहे. यावेळी महेदवीया समाजाचे प्रतिनिधी तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी महेदवीया दायरा कब्रस्तान विषयी पुर्ण माहिती दिली. यावेळी बीड शहर बचाव मंचचे नितीन जायभाये, ज्येष्ठ मार्गदर्शक सेवानिवृत्त प्राचार्य डी.जी. तांदळेसर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, रमेशराव गंगाधरे,ड. नितीन वाघमारे, रामधन जमाले, सुधीरभाऊ देशमुख,पेठबीड विभागातील भुषणजी पवार, आपतक यूट्यूब चॅनल चे संपादक इमरोज भाई, शेख फारुख, शेख वसीफ, शेख नसीर, शेख हनीफ, शेख लईख आदींची उपस्थिती होती.

# प्राथमिक आरोग्य केंद्र किट्टी आडगाव येथे योग दिन साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने प्राथमिक आरोग्य केंद्र किट्टी आडगाव येथे डॉ. सुमित कदम, उक्ज, –छ्च्, चझ्थ, इतर कर्मचारी व गावकरी यांच्या उपस्थितीत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या योग शिबिरात योगाचे महत्त्व सांगण्यात आले व प्रशिक्षण दिले.

आपल्या भारताच्या प्राचीन विद्येपैंकी एक म्हणजे योग निरोगी शरीर, उत्तम आरोग्य आणि ऊर्जा प्राप्तीचा स्रोत आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकजण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहे. मात्र आपण आपल्या शरिराकडे लक्ष देणे गरजेचे असून जर आपल आयुष्य उत्तम आणि निरोगी जगायचं असेल तर प्रत्येकाने स्वत:साठी दिवसातील एक तास नियमित व्यायाम करणे गरजेचे आहे. तसेच योग आणि उत्तम आहार हीच आपल्या निरोगी दीर्घायुष्याची गुरुकिल्ली आहे. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र किट्टी आडगाव येथे डॉ. सुमित कदम, उक्ज, –छ्च्, चझ्थ, इतर कर्मचारी व गावकरी, सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# शाहू–फुले–आंबेडकर विचारधारेचे प्रेरणास्थान श्रावण दादा जगतकर यांचा वाढदिवसानिमित्त गौरवपूर्ण सत्कार

## ॲड. मनोज आप्पा संकाये यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध प्रतिमा देऊन सन्मान

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शाहू–फुले–आंबेडकर चळवळीतील निष्ठावान, अभ्यासू आणि ध्येयवेडे कार्यकर्ते मा. श्रावण दादा जगतकर यांचा वाढदिवस शनिवार दिनांक २१ जून रोजी सामाजिक सलोखा, विचार जागृती आणि आत्मियतेच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी परळी शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा विधिज्ञ ऍडव्होकेट मनोज आप्पा संकाये यांच्या हस्ते त्यांचा शाल, पुष्पहार व तथागत गौतम बुद्ध यांची प्रतिमा देऊन विशेष सत्कार करण्यात आला.



श्रावण दादा जगतकर यांनी आपल्या सामाजिक कार्यातून अन्यायाविरुद्ध आवाज उठवत समतेच्या मूल्यांसाठी दीर्घ काळ काम केले आहे. त्यांनी आयुष्यभर सामाजिक न्याय, शिक्षण, बंधुता आणि स्वाभिमानाच्या मूल्यांचा आग्रह धरत कार्यकर्त्यांमध्ये नवी चेतना निर्माण केली. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आवाका समाजातील अनेक घटकांपर्यंत पोहोचलेला आहे. विविध आंदोलने, जनजागृती मोहीमा आणि वंचित घटकांसाठी लढलेल्या लढ्यामुळे त्यांचं योगदान आजही अनुकरणीय ठरतं आहे. या प्रसंगी ऍडव्होकेट मनोज संकाये यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करत, श्रावण दादा हे केवळ व्यक्ती नाहीत तर चळवळीची चालतीबोलती शाळा आहेत, असे उद्गार काढत त्यांच्याविषयी आदर व्यक्त केला. कार्यक्रमास दैनिक बीड अक्षरधाम चे संपादक बालाजी जगतकर (श्रावण दादांचे सुपुत्र), सामाजिक कार्यकर्ते आत्माराम अवचार, चळवळीतील कार्यकर्ते व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वरूप अत्यंत साधेपणाने, पण मन:पूर्वक साजरे झाले. उपस्थितांनी श्रावण दादा यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या व त्यांच्या दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केली. श्रावण दादा यांचं आयुष्य नव्या पिढीला संघर्ष, समता आणि लोकशाहीच्या मूल्यासाठी झगडण्याची प्रेरणा देत राहील, असा विश्वास अनेकांनी यावेळी व्यक्त केला.

# भगवान महाराज सार्व वाचनालयात जेष्ठ नागरिकांनी आंतरराष्ट्रीय योगा दिवस केला साजरा



बीड । प्रतिनिधी

बीड येथील गुरूवर्य ह भ प भगवान महाराज सार्व वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे दि२१जुन शनिवार रोजी आंतरराष्ट्रीय योगा दिवस जेष्ठ नागरिक वाचक यांनी योगा करून साजरा केला यावेळी युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी वाचक व जेष्ठ नागरिक एम डी पांचाळ सर यांनी मनोगत व्यक्त करताना व्यायामाचे महत्त्व सांगितले तंदुरुस्त शरीर हि काळाची गरज आहे. निरोगी दीर्घायुष्य राहण्यासाठी नियमित योगा करणे आवश्यक आहे. योगा हा मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या माणसाला सक्षम करण्यासाठी प्रभावी माध्यम आहे. आंतरराष्ट्रीय योगा दिवस निमित्त सर्वांना शुभेच्छा देवून त्यांच्या सोबत सर्वांनी योगा केला. यावेळी या वाचनालयाचे संस्थापक व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ संचालक डॉ. राजेंद्र सानप, आर.के. भोंडवे, आश्रुबा नागरगोजे, ग.मा. शहाणे, धनंजय सानप, एच.आर. सानप, काळे इत्यादी सह असंख्य वाचक उपस्थित होते.

# गेवराई ते उमापूर मार्गी थेट भगवानगड बससेवा सुरू

## आ.विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश; लोकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण!

गेवराई । प्रतिनिधी



वारकरी संप्रदायाचे आध्यात्मिक केंद्र आणि श्री संत भगवानबाबा यांचे समाधीस्थान असलेल्या भगवानगडसाठी गेवराई ते उमापूर मार्गी थेट बससेवा सुरू करण्यात आली आहे. विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याने ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली विविध गावचे सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्या मागणीला यश मिळाले आहे. भगवानबाबा यांचे भगवानगड हे समाधीस्थान असून



वारकरी संप्रदायाचे सर्वात मोठे आध्यात्मिक केंद्र आहे.

येथे दरमहा वद्य एकादशीस मोठी यात्रा भरते. विजयादशमीला लाखो भाविकांच्या उपस्थितीत मेळाव्याचे आयोजन केले जाते. बाबांचे मोठे भक्त असून येथून थेट बससेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यांची गेवराई आगाराने दखल घेऊन बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही बस गेवराई ते धोंडराई, उमापूर चकलांबा फाटा, सुकळी, शेकटे, अर्धपिंपरी फाटा, गरड वस्ती, मुरमी, मोठा देवी मंदिर फाटा, शेलार वस्ती फाटा, लाड जळगाव, मुंडे चौक, पारगाव मार्गी भगवानगड अशी जाणार आहे. या बसमुळे प्रवाशांची गैरसोय होणार नसून त्यांचा सुखदायी प्रवास होणार आहे. ग्रामीण भागातील लोकांनी भगवानगड येथे जाण्याची गैरसोय होत असल्याने आम्हाला भगवानगड जाण्यासाठी बसेसची व्यवस्था व्हावी अशी मागणी केली होती. तसेच आमदार विजयसिंह पंडित यांनी या प्रश्नांकडे तातडीने लक्ष घालून गेवराई आगर प्रमुखांना आदेश देऊन बसेस सुरू करण्याचे आदेशित केले. त्यामध्ये प्रमुख्याने गेवराई ते उमापूर मार्गी थेट बस सेवा सुरू करण्यात आली. बस सेवा जनतेच्या सेवेत दिल्याबद्दल या भागातील लोकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



बीड : आषाढी वारी निम्मित श्री क्षेत्र मुक्ताईनगरहून पंढरपूर कडे मार्गस्थ असणाऱ्या संत मुक्ताबाईच्या पालखी चे आगमन आज बीड शहरात झाले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी पालखी चे स्वागत करून संस्थान चे विलास महाराज खोले यांच्या सह वारकऱ्यांचे आदरातिथ्य केले. यावेळी शिवसेनेचे सुशील पिंगळे, नवनाथ प्रभाळे, गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, बाळु वैद्य सह आदी.

# पोलिसांनी वाचविले जखमी हरिणाचे प्राण

केज । प्रतिनिधी

गस्तीवर असलेल्या युसुफवडगाव पोलिसांनी रस्त्यात जखमी झालेल्या हरिणाचे प्राण वाचविले. युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सय्यद अमजद हे त्यांच्या हद्दीत गस्त घालीत असताना केंद्रेवाडी परिसरात रस्त्याच्या कडेला रस्ता ओलांडत असताना एका झाडाच्या खोडाला धडकून एक हरीण जखमी अवस्थेत पडलेले आढळले.

सहाय्यक पोलिस उपनिरीक्षा सय्यद अमजद यांनी तात्काळ हरिनाजवळ जाऊन अंबाजोगाई येथील वनविभागाचे अधिकाऱ्यांना कळविले. माहिती मिळताच वनसेवक विष्णू शेप, भगवान शेप हे घटनास्थळी हजर होऊन त्यांनी जखमी हरिणाला उपचारासाठी घेऊन गेले. दरम्यान, जखमी हरिणाचे प्राण वाचविणाऱ्या सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सय्यद अमजद आणि वनरक्षक विष्णू शीप व भगवान शेप यांचे कौतुक होत आहे.

पान १ वरून...

## महाराज लोकांनो, स्वत:ला ज्ञानोबा तुकोबांचे अनुयायी समजता आणि या पद्धतीने वागता हे किती योग्य वाटतं?

होत आहे. महाराज आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून माझ्या जीवितस धोका आहे. त्यांच्यावरती कडक कार्यवाही करावी अशी मागणी विद्यार्थ्यांचे पालक मनोहर कचरू वारे यांनी केली आहे. ते सध्या बीडच्या जिल्हा रुग्णालयामध्ये उपचार घेत आहेत. बीड जिल्ह्यातील वाघदरा येथील वारकरी शिक्षण संस्थेचे सत्यवान महाराज लाटे यांच्या वारकरी शिक्षण संस्थेत मौजे चिखली तालुका गेवराई जिल्हा बीड येथील श्री. मनोहर कचरू वारे यांचा मुलगा धार्मिक व शैक्षणिक शिक्षणासाठी या वारकरी संप्रदायाच्या वतीने शिक्षण घेत होता. गेल्या अनेक वर्षापासून या संस्थेत शिक्षण घेत असताना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्या ठिकाणी योग्य शिक्षण मिळेल अशा आशेने यावर्षीही तिथेच शालेय शिक्षणासाठी पूर्ण फीस भरून पुढील शिक्षणासाठी मुलाला पाठवले मात्र तेथील संस्था चालक सत्यवान लाटे यांनी काही दिवस उलटल्यानंतर आपला मुलगा परत घेऊन जा असे सांगितले त्यानंतर पालक असलेले मनोहर कचरू वारे यांनी दिलेले पैसे परत द्या अशी मागणी केली पण संपूर्ण फीस परत द्यायला ते संस्था चालक तयार नव्हते. तसेच मनोहर वारे हे त्यांच्या मुलाला आणण्यासाठी संस्थानावर गेले असता त्यांनी दिलेल्या पैशाची मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली होती मी पैसे परत देत नाही आणि मुलगाही सांभाळत नाही अशी हुजत घालवत महाराजांनी व गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी पालक असलेले वारे यांना किरकोळ कारणावरून सत्यवान महाराज लाटे यांनी जबर मारहाण केली आहे रोडने काठीने व दगडाने अशा मारहाणीमुळे पालक असलेले वारे बेशुद्ध पडले व काही वेळानंतर शुद्धीवर आल्यावर महाराजांनी त्यांना हा प्रकार कोणाला सांगितल्यास जिवंत होणार नाही अशी देखील धमकी दिलीय. वारे वाव्व महाराज लोकांनो, स्वत:ला ज्ञानोबा तुकोबाची अनुयानी समजतात या पद्धतीने वागता हे किती योग्य वाटत, बरं दिलेले पैसे परत मागितले ही त्या पालकांकडून काही चूक झाली का, या प्रकरणी कायदा सुव्यवस्था आहे का नाही, आणि एवढ मारणं! अरे बैलाला मारताना पण माणूस विचार करतो. संस्थेवर बोलवत कोणी एवढं मारतो का? असं होत असेल तर मद्यधुंद अवस्थेत तर या पालकाला मारहाण केली नाही ना हा अतिशय चिंतेचा विषय आहे ! महाराष्ट्र राज्य शासनाने या घटनेवरून तात्काळ गांभीर्याने लक्ष्य घालावे याबाबत बीड येथे पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच संतापजनक मागणी म्हणून मौजे चिखली तालुका गेवराई जिल्हा बीड व समस्त गेवराईकरांच्या वतीने होत आहे.

## विवाहितेची विषारी औषध प्राशन करत आत्महत्या

उपचारासाठी तिला अहिल्यानगर येथील एका खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचारादरम्यान तिचा बुधवारी रात्री मृत्यू झाल्याची घटना घडली. मृत विवाहितेचे वडिल जालिंदर मारूती वामन याच्या फिर्यादीवरून गुरूवारी अंभोरा पोलिस ठाण्यात धर्मा विठोबा खाकाळ सासरा, सुशिला धर्मा खाकाळ सासू, ज्ञानेश्वर धर्मा खाकाळ दीर, सविता ज्ञानेश्वर खाकाळ जाव या चार जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीना अटक करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके करीत आहेत.

## कुख्यात दरोडेखोरास दुचाकी चोरीच्या गुन्हयात पकडले

बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा हा अतुल विक्रम वाघमारे याने केला. आरोपी अतुल विक्रम वाघमारे हा संभाजीनगर, बीड येथील किरायच्या राहत्या घराचे जवळ थांबला आहे अशी माहीती वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने छापा मारुन पकडले. त्याचे ताब्यातुन वेगवेगळ्या कंपणीच्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. सदर मोटार सायकल बाबत विचारणा केली असता सदरील मोटार सायकली हया बीड परीसरात वेगवेगळ्या ठिकाणाहुन चोरल्या आहेत. असे आरोपीने सांगीतले त्यापैकी होंडी कंपणीचे शाईन दुचाकी जिचा चेसीस क्रमांक चए४गउ८५६ॠचऊ२०८८०२ आम्ही खात्री केली असता सदरील मोटार सायकल हि पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.नं ३४१/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस मधील असल्याची खात्री झाली. आरोपीने एकुण पाच मोटार सायकली चोरल्याचे कबुल केले. आरोपी व पाच दुचाकी पुढील तपासकामी पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात दिले आहेत. आरोपी अतुल विक्रम वाघमारे याचेवर दरोडेसारखे बरेच गुन्हे दाखल असल्याचे पोलीस अभिलेखावरुन दिसुन येत आहे.

सदरील कारवाई श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, भागवत शेलार, दिपक खांडेकर, आशपाक शेख, चालक संजय जायभाये यांनी केली आहे.



# ग्राम ऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशन, अंबाजोगाई येथे योग दिवस उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ग्राम ऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशन, अंबाजोगाई येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी योगाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे फायदे अधोरेखित करत उपस्थित कार्यकर्ते यांना योगाभ्यासाचे महत्व सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रशिक्षक स्तुती गुप्ता यांनी उपस्थितांना योगाचे शास्त्रीय महत्व सांगत विविध योगासने करून घेतली. त्यांनी ताडासन, वृक्षासन, पदहस्तासन, अर्धचक्रासन, भद्रासन, वज्रासन, सिंहासन तसेच प्राणायाम यांचे सादरीकरण केले. उपस्थित सर्वांनी उत्साहात सहभाग घेत विविध आसनांचा सराव केला.

कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी आणि उपस्थिती लाभली होती. ग्राम ऊर्जा फाउंडेशनकडून ग्रामीण भागात आरोग्य व सशक्त जीवनशैलीचा प्रसार करण्यासाठी योगासारख्या उपक्रमांचे आयोजन होत राहावे, जेणेकरून ग्रामीण मुलांमध्ये आणि नागरिकांमध्ये योगाभ्यासाची आवड निर्माण होईल आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास अध्यक्ष दादासाहेब गायकवाड यांनी या वेळी व्यक्त करण्यात आला.

# दुष्काळी मराठवाडा पाणीदार होणार कसा? २६५४ कोल्हापुरी बंधारे गेटविना

## अजितदादा बीड जिल्ह्यातील १७ सिंचन प्रकल्प रद्द केले निदान आता ५२ कोटी निधीची तरतूद तरी करा : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी
दुष्काळी बीडला पाणीदार बनविण्यासाठी जलसंपदा विभागांकडुन १७ सिंचन प्रकल्प प्रकल्प मंजूर करण्यात आले होते. ३ वर्षात प्रकल्पाचे काम सुरुच झाले नाही त्यामुळे जलसंपदा विभागाने त्याची प्रशासकीय मान्यता रद्द केली आहे. दुष्काळी बीडला हा मोठा धक्का मानला जात आहे. मात्र याचवेळी दुसरीकडे मराठवाड्यातील मोठ्या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे २६५४ बंधारे बांधण्यात आलेले आहेत. परंतु यातील केवळ हिंगोली जिल्ह्यात सर्व बंधाऱ्यांना गेट नसुन उर्वरित जिल्ह्यात पावसात येणारे पाणी गेट अभावी आले तसे वाहून जाते. मराठवाड्यात १९१९१ गेटची आवश्यकता असली तरी याकडे कोणीही लोकप्रतिनिधी अथवा प्रशासकीय अधिकारी गांभीर्याने पाहायला तयार नाही ही वस्तुस्थिती आहे. या बंधाऱ्याच्या गेटच्या दुरूस्तीसाठी ५२ कोटी रूपये निधींची आवश्यकता असुन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी निधीची तरतूद करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

### कोल्हापुरी बंधाऱ्यावरील गेटची स्थिती

| जिल्हा | लागणारे | उपलब्ध | आवश्यक |
|---|---|---|---|
| संभाजीनगर | १८,३३१ | १८५४३ | २८३ |
| जालना | ११,२९५ | ५१५५ | ६१४० |
| परभणी | ३०४३ | १८१५ | १२२८ |
| हिंगोली | ७५५ | ७५५ | ०० |
| नांदेड | ३३३६ | २४७६ | ६८० |
| बीड | २२४४ | ७५१ | १४९१ |
| लातुर | ४४९३ | ३८२६ | ६६९ |
| धाराशिव | ३५७८४ | २७३३४ | ८४४८ |

मराठवाड्यात अनेक जिल्ह्यात डोंगररांगा आहेत. या ठिकाणाहून अनेक नद्यांचा उगम होतो. डोंगररांगात पडणारे पाणी आडवुन सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी मागील अनेक वर्षातून विविध सरकारने प्रयत्न केलेले आहेत. आजवर मराठवाड्यातील नद्यांवर २६५४ कोल्हापुरी पद्धतीने बंधारे बांधण्यात आलेले आहेत. या बंधार्यावर कोट्यावधींचा खर्चही झालेला आहे. अर्थातच इतका खर्च केल्यास बंधाऱ्यात पाणी साठणे आवश्यक आहे. परंतु असे होताना मराठवाड्यात तरी दिसत नाही. आजच्या घडीला हिंगोली वगळता २६३४ बंधाऱ्यांना गेटची आवश्यकता आहे. २६५४ बंधाऱ्यांना ७९,७८१ गेट लागतात. यातील ६०,२६२ गेट आजच्या स्थितीत आहेत. परंतु १९,११९ गेटची कमतरता आहे.
परिणामी प्रति बंधाऱ्याला १ गेट नसले तरी संपूर्णपणे वाहून जाणे साहजिकच आहे. या बंधार्यांना गेट बसविण्यासाठी दरवर्षी निधीची तरतुदी होते. परंतु तरीही गेटची वाणवा कायम आहे. मराठवाड्यात सिंचनाच्या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. दरवर्षी निधी येत असुनही ही अवस्था असेल तर दुर्दैवी आहे. सरकारने मराठवाड्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांना केली आहे. मराठवाड्यात २६५४ कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यात २३५७३५ घसेंमी सिंचन क्षमता आहे. परंतु गेट नसल्याने हे पाणी वाहून जाते. पाणी वाहून गेल्याने जवळपास १४ हजार हेक्टरवरचे सिंचन क्षेत्र कमी झाले आहे. गेट असते तर किमान १० हजार शेतकऱ्यांची जमीन ओलिताखाली आलेली दिसली असती. आज या शेतकऱ्यांना पाण्याअभावी मजुरी करावी लागत आहे.

### दुरूस्तीसाठी ५२ कोटींच्या निधीची आवश्यकता
मराठवाड्यातील २६५४ बंधाऱ्यांना १९,११९ गेट बसविण्यासाठी २५ कोटी ४२ लाख ३९ हजार रूपयांच्या निधीची आवश्यकता आहे. यात संभाजीनगर ३९ लाख, जालना ६१४, परभणी १३५, हिंगोली ००, नांदेड १३२, बीड १५८, लातुर ७४.४१, धाराशिव १३८९ असे एकुण ५२ कोटी ४२ लक्ष रूपयांच्या निधीची आवश्यकता आहे.



### बंधाऱ्याचे गेट चोरीला जात असतील तर गुन्हे दाखल करण्यात कुचराई का?
मराठवाड्यात आज गेट अभावी कोल्हापुरी बंधारे कामाचे राहिले नाहीत निरूपयोगी ठरले आहेत. हि अवस्था का झाली तर बंधाऱ्याचे गेट चोरीला जातात अशी संबंधित विभागाचे अधिकारी कारण देतात. या एका गेटची किंमत मोठी असते. शिवाय चोरट्यांना शेतात काहीही अडथळा नसतो. त्यामुळे चोरी होते. परंतु बंधाऱ्याचे गेट चोरीला गेले म्हणून संबंधित विभाग गुन्हे दाखल करण्यास कुचराई करतो. परीणामी चोरट्यांचे फावत चालले आहे.

## निष्पाप पोलीस हवालदार शहीद समीर मुजावर यांना ५० लाखाची मदत व कुटुंबातील एकास नोकरी देण्यात यावी : रविंद्र शिनगारे

बीड । प्रतिनिधी





जिल्ह्यातील गुन्हेगारीचा फटका पोलीस कुटुंबांना बसताना दिसतोय काल झालेल्या घटनेवरून दिसून येत आहे. मी तर म्हणेल ज्याचा काही गुन्हा नाही असा कर्तव्यात कसूर न करता चोक पणे कर्तव्य बजावणारा १८ वर्षापासून जनतेच्या रक्षणासाठी ऊन वारा पाऊस याची तमा न करता बीड शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथून आंबेजोगाई येथे बदलून गेलेले निष्पाप शहीद समीर मुजावर यांना काल सकाळी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याकारणाने मृत्यू झाला, असला तरी त्यांच्यावर असलेला ताण सांगायचे झाले तर मुलाच्या शैक्षणिक प्रवेश, कुटुंब एका ठिकाणी आपण एका ठिकाणी मुलांचे ऍडमिशन वाढणारा खर्च, आई–वडिलांचा दवाखाना, किरायाचे घर इत्यादी असंख्य विचार पोलीस कर्मचाऱ्यांच्या मनात असतील तर त्याचा विस्फोट होऊन अशा दुःखद घटना घडत आहेत.
पोलीस अधीक्षक साहेबांनी कुटुंबप्रमुख ह्या नात्याने कुटुंबाचे अश्रू पुसण्याचे काम करावे कुटुंबातील एकाला तत्काळ सेवेत सामावून घ्यावे व कुटुंबाला ५० लाखाची मदतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावे. तसेच पोलीस कुटुंबाचे अडीअडचणी म्हणणे ऐकून घेण्यासाठी विशेष शाखा स्थापन करून शाखेच्या माध्यमातून पोलीस व पोलीस कुटुंबांना न्याय देण्यात यावे. म्हणजे आपला पोलीस कर्मचारी अधिकारी कसा तणावमुक्त राहून जनतेचे सुरक्षेचा प्रश्न मोठ्या हिमतीने पार पाडतील. पुरुष पोलीस कर्मचाऱ्यांचे डिप्रेशन हे हाल तर महिला पोलीस कर्मचारी काय असतील महिलांना तर चूल आणि मुल सासू–सासरे संभाळून कर्तव्य बजावणे आहे. आणि आपल्या कुटुंबप्रमुखाचा आपल्याला अभिमान वाटेल. अशी मागणी पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रविंद्र शिनगारे यांनी जाहीर प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून केली आहे.

## धारूर येथे सुजान लॉन्स ठिकाणी जागतिक योग दिन कार्यक्रम संपन्न

धारूर । प्रतिनिधी
देशाचे पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेने जागतिक योग दिन हा भारतभर साजरा होत आहे. धारूर येथे भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगराध्यक्ष डॉ स्वरूपसिंह हजारी यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला तसेच योग दीना निमित भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी यांनी योग हे आरोग्यासाठी खूप महत्वाचे असून योग केल्याने आपले आरोग्य चांगले राहते शरीरा मध्ये रोग प्रतिकार शक्ति वाढते असे अनेक विषयी माहिती डॉ.हजारी यांनी योग दिनानिमित माहिती दिली.



या वेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी योग गुरु उद्धव खाडे, योग गुरु कंकाळ मॅडम, माजी तालुकाध्यक्ष ॲड.बालासाहेब चोले, शहरध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे, युवा मोर्चा शहरध्यक्ष ऍड.मोहन भोसले, मन की बात प्रमुख रामप्रभू मुंडे, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, नितिन शुक्ला, निमेश चिद्रवार, भास्कर, नागरगोजे, केशव रूपनर, राधाकृष्ण चोले, रामधन वावहल, कंकाल काका चिद्रवार काका व सर्व विद्यार्थी कार्यकर्ता उपस्थित होते.

## डॉ.लक्ष्मण वाघमारे यांना डॉक्टर पदवी प्रदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी
समाजसेवा, शिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवतावादी विचारांद्वारे आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. लक्ष्मण मरीबा वाघमारे यांना आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या Cedarbrook University, USA या विद्यापीठाकडून Doctor of Philosophy (Honorary Doctorate) ही पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या मानद पदवीमुळे महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



हा गौरव केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण समाजाचा, कुटुंबाचा आणि महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचा सन्मान असल्याचे मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले. ही पदवी म्हणजे डॉ. वाघमारे यांच्या दीर्घकालीन सातत्यपूर्ण कार्याची, प्रामाणिकपणाची, सामाजिक बांधिलकीची आणि शिक्षण व ज्ञान क्षेत्रातील भरीव योगदानाची जगभरातून घेतलेली पावती आहे.
डॉ. वाघमारे यांनी या पदवीसह घेतलेली शपथही अत्यंत प्रेरणादायक ठरली. प्रामाणिकपणा, कष्ट, सुसंवेदनशीलता, सामाजिक न्याय आणि माणुसकी या मूल्यांचा अंगीकार करत त्यांनी आपले संपूर्ण ज्ञान मानवतेच्या सेवेसाठी वापरण्याचा संकल्प केला. ही शपथ सामाजिक समतेसाठी झगडणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.
डॉ. वाघमारे यांच्या विचारधारेचा मूलभूत गाभा म्हणजे सर्वांसाठी समता आणि सन्मान. जाती, धर्म, वंश, लिंग, आर्थिक स्थिती यावर आधारित कोणताही भेद न करता सर्वांना समान संधी देण्याचा त्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश राहिला आहे. त्यांच्या या यशामुळे समाजात सकारात्मक विचार आणि परिवर्तनाची नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. ही पदवी म्हणजे त्यांच्यासारख्या निष्ठावान आणि जनतेच्या हितासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान आहे.




## योग हा प्रत्येकाच्या शरीरासाठी अत्यावश्यक : डॉ. दत्ता नलावडे

बीड । प्रतिनिधी
मेरा युवा भारत बीड, राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृती विद्यालय बीड या ठिकाणी अकराव्या जागतिक योगा दिनाच्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी योग प्रशिक्षण म्हणून डॉ दत्ता नलावडे तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रमोद जव्हेरी, वैजनाथ खोडवे, निलेश थोरात, तत्त्वशील कांबळे उपस्थित होते.
सर्वप्रथम नलावडे यांनी योग दिनाचे महत्त्व सांगितले तसेच वर्षाचे ३६५ दिवस रोज सकाळी उठून योगा करणे आपल्या शरीरासाठी खूप अत्यावश्यक आहे त्यामुळे आपले शरीर मन निरोगी राहते कोणताही रोग आपलं जवळ भटकत नाही त्यामुळे प्रत्येकाने दररोज कमीत कमी ४० मिनिटे व जास्तीत जास्त एक तास आपल्या शरीरासाठी देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन यावेळी दाता नलावडे यांनी केले. त्यानंतर उपस्थित ४०० विद्यार्थ्यांना योग प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी तत्त्वशील कांबळे यांनी जमलेल्या युवकांना योग दिनानिमित्त व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.
व्यसनापासून दूर राहून आपले शरीर व मन सुदृढ करायचे असेल तर योग हा सर्वोत्तम पर्याय आहे असे मनोगत तत्व शील कांबळे यांनी व्यक्त केले.



मुंजा फुके त्यांची द्वितीय कन्या संध्याताईच्या विवाहप्रसंगी शुभेच्छा देताना संपादक बालाजी जगतकर, माजी नगरसेवक गोविंद कुकर, अनिल अष्टेकर, दिगंबर तायडे ग्रुप ग्रामपंचायत सरपंच विटा वाघलगाव, व्यंकटेश काळे शिरसाळा ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब जगतकर आदी दिसत आहे.

## संत गव्हाणे बाबा पायी दिंडी बांदखेल–सारोळा बद्दीहून पंढरपूरकडे होणार भक्तिमय प्रस्थान

दौलावडगाव । प्रतिनिधी
संत गव्हाणे बाबा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीतून अर्थात, श्री क्षेत्र बांदखेल, सारोळा बद्दी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या संत गव्हाणे बाबा पायी दिंडी सोहळ्याला गुरुवार २६ जून २०२५ रोजी भक्तिमय वातावरणात प्रस्थान होणार आहे. सलग १० व्या वर्षी हा सोहळा साजरा होत असून, शेकडो भाविकांचा सहभाग अपेक्षित आहे.



या पायी दिंडीची सुरुवात २६ जून रोजी सकाळी ९ वाजता श्री जोगेश्वरी मंदिर व श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर, बांदखेल येथून करण्यात येईल. विठ्ठल नामस्मरण, भजन–कीर्तन, हरिपाठ, महाआरती आणि महाप्रसादाच्या माध्यमातून दिंडीचे सर्व दिवस भक्तिमय वातावरणात पार पडणार आहेत. दिवसेंदिवस भक्तांचा वाढता उत्साह दिंडीमध्ये दिसून येत आहे. प्रत्येक दिवशी सकाळचा चहा/नाश्ता, दुपार व सायंकाळचे भोजन विविध गावांतील ग्रामस्थ, राजकीय सामाजिक धार्मिक कार्यकर्ते, भजनी मंडळे व दिंडीप्रेमी दानशूर देणगीदार मंडळी यांच्याकडून आयोजित दिंडीमध्ये बांदखेल, सारोळा बद्दी यांच्यासह पंचक्रोशीतील अनेक गावांतील भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी सहभागी होत आहेत.
दिंडी चालक समस्त ग्रामस्थ, भजनी मंडळ, बांदखेल व सारोळा बद्दी येथील सर्व संतभक्त मंडळी या दिंडीचे नियोजन करीत आहेत. या सोहळ्यासाठी देणगीदार, हार्मोनियम वादक मृदंगाचार्य गायनाचार्य विणेकरी, रथ सारथी स्वयंसेवक भालदार चोपदार, साऊंड सिस्टीम, आचारी साहित्य व्यवस्थापक वाहनचालक, टँकर व्यवस्था धारक या सर्वांचे मोलाचे योगदान लाभत आहे. वारकऱ्यांनी सोबत आतरून, पांघरूण सोबत आणावे, पांढरा पोषक परिधान करावा, गैरवर्तन टाळावे, मौल्यवान वस्तू सोबत आणू नये, वित्त व जीवित हानी टाळण्यासाठी काळजी घ्यावी असे आवाहन दिंडी व्यवस्थापक कडून करण्यात आले आहे. तसेच या दिंडी दरम्यान शिस्तबद्धता, स्वच्छता, भक्तीभाव जपावा नियोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी होवे, दिंडी सोहळ्याचा मुक्काम ६५ एकर पंढरपूर या ठिकाणी असणार आहे.

## महिला कला महाविद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी
येथील महिला कला महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१/०६/२०२५ रोजी आंतराष्ट्रीय योग दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर ह्या होत्या कार्यक्रम प्रसंगी विचार मंचावर डॉ.बबन बोबडे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी) व डॉ.ज्योती गायकवाड (क्रीडा विभाग प्रमुख) यांची उपस्थिती होती.
कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी सुरुवातीला ११ व्या आंतराष्ट्रीय योग दिनाची थिम सांगितली 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' आहे. या थीमनुसार,




वैयक्तिक आरोग्य आणि जागतिक आरोग्य हे कायमचे जोडलेले आहेत असे सांगितले. व सर्वांनी नियमित योगा करणे आवश्यक आहे. त्यामुळे आरोग्य चांगले राहते असे सांगून योग दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.
आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, भुजंग आसन, नौकाआसन, वज्राआसन, धनुरासन, शवासन, ध्यान, हास्य योग, मुद्राआसन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बबन बोबडे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी) यांनी केले. तर आभार डॉ. ज्योती गायकवाड (क्रीडा विभाग प्रमुख) यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांनी घेतले योगाचे धडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी
कै.दे.बा.ग.यो.नू. विद्यालय (स्वा.रा.ति. रुग्णालय परिसर) येथे २१ जुन शनिवारी जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी योग शिक्षक मोरगावकर हे प्रमुख पाहुणे, मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.
विभाग प्रमुख श्रीनिवास वैद्य यांनी मोरगावकर यांचे यथोचित स्वागत केले. विद्यालयाच्या मैदानावर सर्व विद्यार्थ्यांनी विविध योग प्रात्यक्षिकात सहभाग घेतला. यावेळी शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेवानिवृत्त सैनिक विलास चक्रे व पंडित चक्रे यांचा महामानव अभिवादन ग्रुप बीड च्या वतीने सत्कार संपन्न

बीड । प्रतिनिधी
अभिवादन ग्रुपच्या कार्यालयामध्ये सेवानिवृत्त सैनिक विलास चक्रे व पंडित चक्रे यांचा सत्कार करण्यात आला. देशसेवा करून आल्या नंतर पोलीस प्रशासनामध्ये भरती होऊन पुन्हा एकदा जनतेची सेवा करण्यासाठी विलास चक्रे हे पोलीस भरती झाल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर सेवानिवृत्त सैनिक पंडित चक्रे यांच्या मुलास दुबई येथील आय आय टी कंपनी मध्ये नोकरी लागल्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला.
महामानव अभिवादन ग्रुप बीडच्या वतीने शहरांमध्ये दोन ठिकाणी मोफत शिकवणी



वर्ग (ट्युशन) चालू आहेत. त्याच्या प्रचंड प्रतिसादामुळे व विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या प्रगतीला पाहून आणखी एक नवीन मोफत शिकवणी वर्ग सुरू करण्याचा संकल्प महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने करण्यात आला. हे शिकवणी वर्ग पूर्णपणे जागृत समाज बांधवांच्या वतीने आर्थिक वर्गणी करून चालविण्यात येतात. त्याचप्रमाणे शिकवणी वर्गामधील मुला–मुलींना शालेय साहित्य देखील मोफत देण्यात येते अशा या लोकोपयोगी उपक्रमामुळे जिल्ह्यातच नव्हे तर जिल्ह्याच्या बाहेर देखील या उपक्रमाची स्तुती होत आहे म्हणून आता तिसरा मोफत शिकवणी वर्ग सुरू करण्याचा संकल्प महामानव अभिवादन ग्रुप ने केला आहे. या ग्रुपमध्ये आपण देखील आपलं आर्थिक योगदान देऊ शकत असाल तर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष माननीय गुलाब भोले त्याचबरोबर वाचाल तर वाचाल मोफत फिरते वाचनालय चे डी.जी. वानखेडे, अशोक गायकवाड, राजभाऊ आठवले यांच्याशी संपर्क करून तन–मन–धनाने सहभागी व्हावे असे आवाहन महामानव अभिवादन ग्रुप च्या सर्व सभासदाकडून करण्यात येत आहे.
याचवेळी सत्कार समारंभ उपस्थित ०६ जणांनी दरमहा नियमित दान देण्याचे जाहिरात करून या महिण्याचे दान दिले. सत्कार समारंभाचे अध्यक्ष डि.जी.वानखेडे होते. जि. एम भोले यांनी प्रस्ताविक केले तर सुत्रसंचलन डी.एम. राऊत यांनी केले तर आभार प्रदर्शन कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी केले. या कार्यक्रमाला काशिनाथ वाघमारे, से.नि.पो.उप.नि.तानाजी शिनगारे, बी.डी.तांगडे, एस.एस.सोनवणे व प्रशांत वासनिक यांच्यासह बहुसंख्ये सदस्य उपस्थित होते.

